210/2866
Monday, December 14, 2020
12:31 PM

# पावती

**Original/Duplicate**
नोंदणी क्र. :39म
Regn.:39M

पावती क्र.: 6129 दिनांक: 14/12/2020

गावाचे नाव: **रहाटगांव**
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: **अरन1-2866-2020**
दस्तऐवजाचा प्रकार : **विकसनकरारनामा**
सादर करणाऱ्याचे नाव: . . **मे यश बिल्डर्स तर्फे प्रोप्रा श्याम प्रभाकरराव केदारे**

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 30000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 500.00 |
| पृष्ठांची संख्या: 25 | |
| एकूण: | रु. 30500.00 |

मुळ दस्तऐवज परत दिला

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे 12:45 PM ह्या वेळेस मिळेल.

Sub Registrar Amaravati

बाजार मुल्य: रु.5128000 /-
मोबदला रु.5128000/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 256400/-

1) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.500/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 0812202001658 दिनांक: 14/12/2020
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH007983520202021M दिनांक: 14/12/2020
बँकेचे नाव व पत्ता:

WK**

अ-र-ण-१
२६६/९.२४
२०२०

CHALLAN
MTR Form Number-6

| GRN | MH007983520202021M | BARCODE | | Date | 07/12/2020-17:46:49 | Form ID | 25.1 |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| Department | Inspector General Of Registration | Payer Details | |
| Type of Payment | Stamp Duty<br>Registration Fee | TAX ID / TAN (If Any) | |
| | | PAN No.(If Applicable) | |
| Office Name | AMT1_HQR SUB REGISTRAR AMRAVATI 1 | Full Name | MS YASH BUILDERS THROUGH PROP SHYAM PRABHAKAR KEDARE |
| Location | AMRAVATI | | |
| Year | 2020-2021 One Time | Flat/Block No. | S NO 162/1-A, 162/1-B, 163/2 PLOT NO 39 |
| | | Premises/Building | |

| Account Head Details | Amount In Rs. | | |
|---|---|---|---|
| 0030046401 Stamp Duty | 256400.00 | Road/Street | AREA 278.81 SQMTR |
| 0030063301 Registration Fee | 30000.00 | Area/Locality | MOUJE - RAHATGAON |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 4 4 6 0 3 |
| | | Remarks (If Any) | SecondPartyName=SHRI NARENDRAKUMAR BADRINARAYAN KAHANDEWAL~-Marketval=5125000 |
| | | Amount In Words | Two Lakh Eighty Six Thousand Four Hundred Rupees Only |
| Total | 2,86,400.00 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Payment Details | STATE BANK OF INDIA | FOR USE IN RECEIVING BANK | | |
| Cheque-DD Details | | Bank CIN | Ref. No. | 00040572020120828465 CPAALREHK2 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 07/12/2020-17:46:51 Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | STATE BANK OF INDIA |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll |

Department ID :
Mobile No. : 0000000000

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही.

The Seal of the Sub-Registrar Class-2, Amravati City-1, Dist. Amravati

०५०८ Department of Stamp & Registration, Maharashtra

Receipt of Document Handling Charges

| | | | |
|---|---|---|---|
| PRN | 0812202001658 | Date | 08/12/2020 |

Received from MS YASH BUILDERS THROUGH PROP SHYAM P KEDARE , Mobile number 0000000000, an amount of Rs.500/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSARITA) in the Sub Registrar office S.R. Amaravati 1 of the District Amravatii.

**Payment Details**

| | | | |
|---|---|---|---|
| Bank Name | YESB | Date | 08/12/2020 |
| Bank CIN | 10004152020120811483 | REF No. | 111610468018 |

This is computer generated receipt, hence no signature is required.

अ-र-ण-१

२८६६/२२४

२०२०

The Seal of the Sub-Registrar Class-2, Amravati City-1

अ-र-ण-१
२९६६/३-२४
२०२०

सह जिल्हा निबंधक वर्ग-१, तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.
श्री. ठाकरे यांची ईमारत, मांगिलाल प्लॉट, कॅम्प रोड, अमरावती यांचे समक्षचे अभिनिर्णय
प्रकरण क्र. ADJ/६१००९०१/३८/२०२०-२१

फोन : ०७२१-२६६२६४०/२६६६१५२. ई-मेल jdr.amravati@igrmaharashtra.gov.in

जा.क्र. अभिनिर्णय/२९०२/२०२० दिनांक १४/११/२०२०.

प्रति,

मे.यश बिल्डर्स तर्फे प्रो.प्रा.श्याम प्रभाकरराव केदारे
रा.अर्जुन नगर,अमरावती

विषय:- महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८) चे कलम ३१ खाली अभिनिर्णयाबाबत

संदर्भ:- मे.यश बिल्डर्स तर्फे प्रो.प्रा.श्याम प्रभाकरराव केदारे रा.अर्जुन नगर,अमरावती,यांचा दि.१०/११/२०२०.रोजीचा अर्ज

आपला विषयांकित अर्ज व या कार्यालयाकडे दाखल कागदपत्राचे आधारे या प्रकरणात खालील प्रमाणे अभिनिर्णय कळविण्यात येत आहे.

अभिनिर्णय

अभिनिर्णयाकरीता संदर्भिय अर्जान्वये या कार्यालयाकडे दाखल केलेले कागदपत्रे, पुरावे आपले म्हणणे, यांचे आधारे व दस्ताचे प्रारुप/अनिष्पादीत असलेला दस्त हा महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुसुची १ अनुच्छेद ५(ग-अ) यात मोडत आहे.

हा दस्त कलम ३१ (३) वाचा कलम ३२ अ चे कक्षेत येतो.सदर दस्त विकसन करारनामा असुन विकसन करारनामा लिहुण देणार मे.यश बिल्डर्स तर्फे प्रो.प्रा.श्याम प्रभाकरराव केदारे रा.अर्जुन नगर,अमरावती व विकसन करारनामा लिहुण घेणार श्री.नरेंद्रकुमार बद्रीनारायण खंडेलवाल रा. रुखिमणी नगर,अमरावती यांचेत विकसन करारनामा झाल्याचे दिसुन येत आहे.

मौजा रहाटगाव,अमरावती येथील सर्व्हे नं.१६२/१अ,१६२/१ब,व १६३/२ मधील प्लॉट नं. ३९ क्षेत्रफळ २७८.८१ चौरस मिटर व या वरील बांधकाम या मिळकतीचे बाजारमुल्यदर तक्त्यानुसार कीती मुद्रांक शुल्क अपेक्षीत आहे. व कसे याबाबत अपेक्षीत मुल्यांकन कळविण्या करीता सदरील प्रकरण या कार्यालयाचे स.न.र.मुल्यांकन यांचेकडे वर्ग करण्यात आला असता. स.न.र.मुल्यांकन यांचेकडुन मुल्यांकन अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या नुसार सदर मिळकतीचे सुचना क्र.३२, अ प्रमाणे जमिन मालकास मिळणा-या बांधकाम मुल्य रु. ५१,२८,०००/- प्रस्तावित केलेले आहे. व सुचना क्र.३२,ब प्रमाणे विकसनकर्त्याला मिळणा-या जमिनीचे मुल्य रु. २०,४०,०००/- प्रस्तावित केलेले आहे. सुचना ३२ अ प्रमाणे जास्त मुल्य प्रस्तावित होत असल्याने कलम २(na)नुसार बाजारमुल्य रु. ५१,२८,०००/-निर्धारित करण्यात येत आहे. या बाजारमुल्य किंमती वर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुसुची १ मधील अनुच्छेद ५ (g-a) नुसार मुद्रांक शुल्क ५% प्रमाणे एकुण रु. २,५६,४००/-इतका मुद्रांक शुल्क आहे.

Seal of the Sub-Registrar Class-2, Amravati

अ-र-ण-१
२६८८/8-२५
२०२०

*आदेश*

वर नमूद केलेल्या पार्श्वभूमिवर मी खाली सही करणार मुद्रांक जिल्हाधिकारी, अमरावती असे आदेश करतो की, विषयांकीत संलेखावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुसुची १ मधील अनुच्छेद ५(g-a) चे तरतुदी नुसार मुद्रांक शुल्क ५% प्रमाणे एकुण रु. २,५६,४००/- (अक्षरी रु. दोन लाख छप्पन हजार चारशे मात्र) इतका मुद्रांक शुल्क देय ठरतो. हा अभिनिर्णय महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३२ (ब), व ५३ मधील तरतूदीचे अधिन राहुन देण्यात येत आहे.

वर दिलेल्या अभिनिर्णयानुसार आपण प्रस्तावित दस्तास देय ठरणारे मुद्रांक शुल्क रु. २,५६,४००/- (अक्षरी रु. दोन लाख छप्पन हजार चारशे मात्र) इतकी ई-चलान/ईएसबिटिआर या व्दारे सदरचा आदेश मिळाल्यापासुन ६० दिवसाच्या आत मुद्रांकित करुन शासनजमा करुन सदर दस्त निष्पादीत करुन या कार्यालयाकडे दाखल केल्यास तो दस्त उक्त अधिनियमाचे कलम ३२ खाली प्र माणीत करुन दिला जाईल.

उपरोक्त आदेश मान्य नसल्यास आदेश मिळाल्याचे दिनांकापासून ६० दिवसामध्ये रक्कम रुपये ३००/- भरुन मा.नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३२ (ब) अन्वये अपील दाखल करता येईल.

The Seal of the Joint District Registrar, Amravati
Dist. Amravati

(डी.एस.भोसले)
मुद्रांक जिल्हाधिकारी,
अमरावती

The Seal of the Sub-Registrar Class-2, Amravati City-1
Dist. Amravati

अ-र-ण-१
५६६ / ५.२५
२०२०

**मौजे-रहाटगांव, वि.क्र.२.२९, व्यवसायीक दर रु.३१,५००/- व**

**निवासी दर रु.२४,५००/- प्रति चौ.मि.**

मुद्रांक रु.------------------/-

# जमीन विकास करारनामा

## (डेव्हलप्मेंट ॲग्रीमेंट)

| | |
|---|---|
| **विकास करार लिहून घेणार :** | **श्री. नरेंद्रकुमार बद्रीनारायण खंडेलवाल** |
| **(पार्टी नं.१)** | वय-६५ वर्षे, धंदा-व्यापार |
| | रा.जगताप पेट्रोल पंपाजवळ |
| | रुखिमणी नगर, अमरावती. |
| | पॅन-ABIPK 3756A |
| **विकास करार लिहून देणार :** | **मे. यश बिल्डर्स** |
| **(पार्टी नं.२)** | **तर्फे प्रोप्रा. श्याम प्रभाकरराव केदारे** |
| | वय-४१ वर्षे, धंदा-व्यापार |
| | रा.अर्जुन नगर, अमरावती-४४४६०३ |
| | पॅन-AIGPK 9517N |

विकास करारनामा आज दि.११.०८.२०२० रोजी विकास करारनामा लिहून देणार आणि लिहून घेणार यांचेमध्ये अमरावती सहदुय्यम निबंधक कार्यालय, अमरावती येथे आपसी संमतीने करण्यात येत आहे.

१) सदर मालमत्ता लिहून घेणार यांची स्वत:चे मालकीची असून, सदर मालमत्ता दि.[illegible] रोजी दस्त अ.क्र.१३७८ नुसार खरेदी केलेली आहे, त्याचे वर्णन-

| अ-र-ण-१ |
|---|
| ९६६/ए.२५ |
| २०२० |

-2-

मौजे-रहाटगांव, प्रगणे-नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती येथील सर्व्हे नं.१६२/१अ, १६२/१ब, १६३/२ मधील लेआऊट प्लॉट नं.३९ याचे एकुण क्षेत्रफळ २७८.८१ चौ.मि. (३००० चौ.फुट) जिचे तपशिलवार वर्णन या लेखाच्या शेवटी परिशिष्टात दिले आहे.

२) विकसन करारनामा लिहून घेणार आणि लिहून देणार प्रवर्तक यांनी आपसी संमतीने सदर जागेवर अपार्टमेन्ट बांधून या जागेचा विकास करण्याचे ठरलेले आहे.

३) सदर बोलणी होऊन दोघांत खालील अटी व तरतुदीनुसार करार करण्याचे ठरले आहे. त्या अर्थी सदर दोन्ही लिहून घेणार व लिहून देणार यांचेमध्ये खालील करार करण्यात येत आहे.

i) उपरोक्त जमिनीचा बांधकाम करुन विकास करण्याचे हेतुने लिहून देणार मालक यांनी लिहून घेणार विकासकास सदर जमीन ताब्यात देण्याचे कबूल करीत आहे व त्याप्रमाणे या करारावर सहया करण्याचे वेळी सदर जमिनीचा ताबा लिहून घेणार यांना पुढील अटी व शर्ती वर देण्यात येत आहे.

ii) विकसन करारनामा लिहून घेणार प्रवर्तक या कराराने कबुल करतात की, सदर जमिनीचा विकास पुढील तरतुदी प्रमाणे व अटींवर करतील. सदर विकास करण्याकरिता ज्या-ज्या परवानग्या, सरकारी किंवा निमसरकारी अधिकाऱ्यांकडून घेणे आवश्यक आहे, त्या प्रवर्तकाने आपले खर्चाने व विकास कामाला सुरुवात करण्यापूर्वी प्राप्त करुन घेतील. तसेच सदर जमिनीवर जी इमारत बांधण्यात येईल त्याचे सर्व नकाशे अमरावती मनपा यांचेकडून मंजूर करुन घेतील.

iii) विकसन करारनामा लिहून घेणार या करारान्वये करण्यात आलेल्या विकासकामाच्या इतक्या हिस्स्यांचे मोबदल्यात लिहून घेणार यांनी लिहून देणार यास खालील प्रमाणे मोबदला देण्याचे ठरले आहे.

अ) पहिल्या माळयावरील फ्लॅट क्र.१०१, याचे सुपर बिल्टअप क्षेत्र ९०५ चौ.फुट (८४.१० चौ.मि.)

ब) पहिल्या माळयावरील फ्लॅट क्र.१०२, याचे सुपर बिल्टअप क्षेत्र ९०५ चौ.फुट (८४.१० चौ.मि.)

क) अप्पर गाऊंड फ्लोअर माळयावरील दुकान क्र.४, याचे सुपर बिल्टअप क्षेत्र १०५ चौ.फुट (९.७५ चौ.मि.)

ड) अप्पर गाऊंड फ्लोअर माळयावरील दुकान क्र.५, याचे सुपर बिल्टअप क्षेत्र १०५ चौ.फुट (९.७५ चौ.मि.)

इ) अप्पर गाऊंड फ्लोअर माळयावरील दुकान क्र.६, याचे सुपर बिल्टअप क्षेत्र १०५ चौ.फुट (९.७५ चौ.मि.)

या करारान्वये प्रवर्तक लिहून देणार कबूल करतो की, सदर मोबदला देण्यात येणा-या मालमत्तेकरिता पार्किंग देण्याचे आणि इले.मिटर खर्च प्रवर्तक पार्टी नं.२ करेल.

सदर जमिनीवर बांधकामपूर्ण होईपर्यंत शासकीय नियमाप्रमाणे जे चटाई क्षेत्र (एफ.एस.आय.) उपलब्ध आहे, किंवा होईल त्या सर्व चटाई क्षेत्रासाठी सदरचा मोबदला देण्यात येत आहे. प्रवर्तकाने लिहून देणार यांनी प्रस्तावीत इमारतीचा नकाशा तयार केलेला असून, त्या नुसारच उल्लेखीत मोजमापाचे बांधकाम लिहून घेणार मालकास देण्याचे ठरलेले आहे.

४) विकसन करारनामा लिहून देणार यांनी लिहून घेणार हे सदर जागेचे पूर्ण मालक आहेत, याची खातरजमा करुन घेतलेली आहे. त्यांच्या मालकी हक्कासंबंधी लिहून देणार कोणतीही हरकत घेणार नाही.

लिहून देणार सदर जमिनीवर आयोजित इमारतीचे नकाशे मंजूर झाल्याशिवाय (मनपा) अमरावती यांचे कडून काम करण्याचा परवाना मिळाल्याशिवाय सदर जमिनीवर

P-10- अ-र-ण-१
३८६६ / ८२५
०१-२-२०२०

कसलेही काम सुरु करणार नाही. वरील सर्व शासकीय परवानग्या लवकरात लवकर मिळविण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील, त्या करिता लिहून घेणार आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यास बांधील राहील.

६) सदर जमिनीवर बांधण्यात येणारी इमारतीचे सर्व खर्चाची जबाबदारी करारनामा लिहून देणार यांची राहील. सदर करारनामा नोंदणी करण्यापूर्वी जमीन मालकाने सदर जागेचा सर्व कर भरुन जमीन लिहून देणार यांचे ताब्यात देण्याचे मान्य केलेले आहे.

७) लिहून घेणार या कराराने लिहून देणार यांसी सदर जमिनीचा ताबा घेण्यास परवानगी देत आहे व त्यावर मनपा अम. यांनी मंजूर केलेले नकाशानुसार इमारत बांधण्याचा व त्या संबंधीच्या सर्व बाबी करण्याचा अधिकार देत आहेत. सदर इमारत बांधण्याचा अधिकार लिहून घेणार यांचा व्यक्तीगत आहे व जो अधिकार दुसरा कुणालाही जमीन मालकाच्या पूर्वपरवानगी शिवाय देण्याचा प्रवर्तकाला अधिकार असणार नाही.

८) मनपा अमरावती यांनी दिलेल्या मंजुरीचा किंवा शासनाने दिलेल्या परवाण्याचा प्रवर्तकाने भंग केल्यास हा करार मोडण्याचा मालकाला अधिकार राहील तसेच सदर भंगामुळे जमीन मालकाला काही तोशिस लागली किंवा नुकसान झाल्यास त्याची भरपाई करण्याची लिहून देणार यांचे वर जबाबदारी राहील. सदर कारणाकरिता हा करार मोडण्याचा असल्यास मालकाने लिहून देणार यांस एक महिन्याची आगाऊ नोटीस दिली पाहिजे व सदर मुदतीत लिहून देणार यांनी कोणत्याही अटी व शर्तीचा भंगाची दुरस्ती केल्यास हा करार मोडता येणार नाही.

९) सदर जमिनीवर बांधण्यात येणाऱ्या इमारती संबंधी जे जे अर्ज करावे लागतील किंवा अन्य कागदपत्रे दाखल करावे लागतील त्यांचेवर जरुर असल्यास मालक सह्या करतील परंतु त्यामुळे मालकावर कसलिही आर्थिक जबाबदारी पडणार नाही व तसे झाल्यास त्याची भरपाई लिहून देणार बांधील राहील.

अ-र-ण-१
२६६२/१८-२४
२०२०

१०) सदर विकास कामासाठी ज्या ज्या गोष्टी किंवा जी जी कामे करावी लागतील किंवा जी जी कागदपत्रे करावी लागतील व त्या सर्व गोष्टी किंवा कामे व कागदपत्रे मालकाच्या वतीने कराव्या लागतील तर त्या करण्यासाठी मालक विकास करारनामा लिहून देणार यांचे नावे मुखत्यारपत्र करुन देतील.

११) सदर इमारतीच्या बांधकामासाठी व त्यातील सदनिकांच्या सोयीसाठी जी बांधकामे, गटारे व त्या संबंधी नळ पाण्याची योजना व तत्संबंधीची कामे, विजपुरवठयासाठी लागणारी कामे वगैरे सर्व नित्यनैमित्तीक कामे करण्याचा लिहून देणार यांस अधिकार आहे व प्रवर्तकाने आपल्या खर्चाने करावयाच्या आहेत व त्याकरिता मालकाच्या संमतीची किंवा सहयाची आवश्यकता असल्यास मालक तसे करतील व सर्व प्रकार सहया करतील. परंतु वरील सर्व गोष्टी लिहून देणार यांनी कायदे-कानून, नियम व संबंधीत सरकारी अगर निमसरकारी बंधने यांना अनुसरुन करावयाच्या आहेत.

१२) सदर इमारतीमधील सदनिका (फ्लॅट) लिहून घेणार प्रवर्तकास योग्य वाटेल त्या किंमतीला व योग्य त्या अटी, तरतुदींवर विकण्याचा अधिकार राहील व त्यात मालक काही ढवळाढवळ करणार नाही. त्याच प्रमाणे सदनिका खरेदीदारां बरोबर सदनिका विक्रीचा जो करार करावा लागेल तो प्रवर्तकाने / विकासन करारनामा लिहून देणार याने आपल्या नावे करावा त्यावर मालक सही करायला बांधीलेले नाहीत. तसेच अशा करारातील तरतुदींचे पुर्ततेची जबाबदारी प्रवर्तकाची राहील व त्या संबंधी मालकाचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई सदर करार लिहून देणारास करावी लागेल.

१३) सदर इमारतीचे बांधकामासाठी लागणारे सर्व साहित्य व मजुरवर्ग व इतर नोकरवर्ग यांचे पगाराची व इतर देण्याची जबाबदारी लिहून देणार प्रवर्तकाची राहील. सदर कामाकरिता बांधकाम कॉन्ट्रॅक्टर, मजूर कॉन्ट्रॅक्टर वगैरे व्यावसायीकांशी स्वतंत्र

| |
|---|
| २८EE/90-25 |
| २०२० |

करार करण्याचा प्रवर्तकाला अधिकार राहतील. त्या संबंधीची सर्व जबाबदारी प्रवर्तकाची राहील, मालकावर असणार नाही. तसेच सदर इमारतीचे काम चालू असतांना काही अपघातामुळे किंवा अन्य कारणाने अन्य कोणाला नुकसान भरपाई द्यावी लागल्यास त्याची जबाबदारी प्रवर्तकावर राहील, मालक पार्टी नं.१ वर राहणार नाही.

१४) सदर विकासकामाचे प्रसिध्दीसाठी सदर जमिनीवर व इतर ठिकाणी योग्य त्या जागी जाहिरात फलक स्वखर्चाने बसविण्याचा प्रवर्तकाला अधिकार राहील पण त्याची जबाबदारी मालकावर असणार नाही.

१५) सदर अपार्टमेन्टचे बांधकाम पूर्ण झाल्यावर आणि मनपा अम. यांचे नाहरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर प्रवर्तक पार्टी नं.२ फ्लॅट खरेदीदाराला त्यांनी खरेदी केलेल्या सदनिका त्यांच्याशी झालेल्या करारानुसार त्यांना खरेदी करुन देईल त्यास लिहून घेणार पार्टी नं.१ हे कोणतीही बाधा आणणार नाहीत.

अ) सदर मिळकतीवर बांधकाम करण्यात येणाऱ्या इमारतीस "कैलास टॉवर" असे नाव देण्याचे लिहून देणार व लिहून घेणार यांचेमध्ये मान्य झाले आहे.

१६) सदर जमिनीचा करारनामा लिहून देणार प्रवर्तकास ताबा मिळाल्यानंतर सदर जमिनीसंदर्भात लागणारे कर व इतर तत्सम देणे देण्याची जबाबदारी प्रवर्तकावर राहील. तसेच बांधकामासाठी द्यावे लागणारे शुल्क, तारण ठेवीच्या रकमा, कर व इतर सर्व प्रकारच्या देण्याची जबाबदारी प्रवर्तकावर राहील, त्याला मालक जबाबदार असणार नाहीत.

१७) या व्यवहारासंबंधी करावयास लागणारे इतर सर्व खर्च प्रवर्तकाने द्यावयाचे आहे. या करारावर द्यावयाचे मुद्रांक शुल्क प्रवर्तकाने द्यावयाचे आहे. तसेच या व्यवहारासंबंधी प्रवर्तकाचे वकिलांची फी तसेच इतर कायदेशिर खर्च लिहून देणार प्रर्वतकाने करावयाची आहेत.

The Joint Sub-Registrar Class-2 Amravati City-1

१८) या करारान्वये किंवा अन्यथा सदर विकासकामांसंबधी सर्व प्रकारचे खर्चांची जबाबदारी लिहून देणार प्रवर्तकाची राहील व त्या संबंधी मालकाला काही तोशीस लागल्यास किंवा पैसे भरावे लागल्यास किंवा अन्य नुकसान झाल्यास त्याची भरपाई करण्याची जबाबदारी प्रवर्तकावर आहे व तसे करण्याचे लिहून घेणार मालकाला अभिवचन देत आहे.

१९) लिहून देणार हा लिहून घेणार प्रवर्तकाला असे अभिवचन देत आहे की,

अ) हा करार करण्याचा मालकाला पूर्ण हक्क आहे व तसे न आढळून आल्यास, त्यामुळे प्रवर्तकाला काही तोशीस लागल्यास त्याची भरपाई मालक करतील. जमीन मालकाने आजरोजी पर्यंत त्यांचेकडे असलेले सर्व कागदपत्रे प्रवर्तकास दाखविलेले आहे.

ब) मालकाने सदर जमिनीसंबंधी कोणत्याही प्रकारचा करार किंवा अन्य व्यवहार इतर कोणाशी केला नाही.

क) तसेच सदर विकासकामाला हरकत येईल असे कोणतेही कृत्य मालकाने केलेले नाहीत.

ड) सदर जमीनविकास करारनाम्याप्रमाणे सदर अपार्टमेन्ट प्रवर्तकाने २४ महिन्यामध्ये पूर्ण करणे बंधनकारक राहील, ही अवधी काही विशिष्ट कारणामुळे वाढविण्याचे असल्यास, लिहून घेणार पार्टी नं.१ मालकाच्या पूर्व संमतीने वाढविता येईल.

२०) या कराराखाली सदर लिहून देणार प्रवर्तक हा मालकाच्या मुखत्यार किंवा अभिकर्ता समजला जाणार नाही व सदर विकासकाम प्रवर्तक आपल्या जबाबदारीवर करणार आहेत. तसेच हा करार मालक व प्रवर्तक यांचेतील भागीदारी करार म्हणून समजला जाणार नाही.

अ-र-ण-१
२६६/१२-२५
२०२०



येणेप्रमाणे हा करार दोन्ही पक्षकारांनी केला आहे व त्याची साक्ष म्हणून दुय्यम निबंधक कार्यालय अमरावती येथे सहदुय्यम निबंधक साहेब यांचे समक्ष सहया केल्या आहेत.

## परिशिष्ट

**मौजे-रहाटगांव,** प्रगणे-नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती येथील **सर्व्हे नं.१६२/१अ, १६२/१ब, १६३/२** मधील लेआऊट **प्लॉट नं.३९** याचे एकूण **क्षेत्रफळ २७८.८१ चौ.मि. (३०००.०० चौ.फुट)** अमरावती मनपाचे हद्दीत आहे. याची चर्तुःसिमा-

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | - | याच लेआऊट मधील प्लॉट नं.४० |
| पश्चिमेस | - | याच लेआऊट मधील प्लॉट नं.३८ |
| उत्तरेस | - | याच लेआऊट मधील सर्व्हीस लाईन |
| दक्षिणेस | - | याच लेआऊट मधील ३० फुट रुंदीचा रोड |

सदर विकसन करारनामा आम्ही आमचे राजीखुशीने, वाचून, समजून, खाली साक्षीदारासमक्ष सही करुन लिहून दिला, तो आम्हाला व आमचे इस्टेट वारसास नेहमीकरीता लागु व बंधनकारक राहील.

अमरावती. दिनांक : १७.०८.२०२०

**विकास करार लिहून देणार :** **मे. यश बिल्डर्स**

**तर्फे प्रोप्रा. श्याम प्रभाकरराव केदारे**

| फोटो | अंगठा | सही |
|---|---|---|
|  | | |

विकास करार लिहून घेणार : श्री. नरेंद्रकुमार बद्रीनारायण खंडेलवाल

| फोटो | अंगठा | सही |
| --- | --- | --- |
|  |  | NKhandelwal |

अ-र-पा-१
९८६६/93-24
२०२०

साक्षीदार :

१) M.S.Angale

नाव - मेहरदिप स ठगाळे

रा. अमरावती

२) Paranjape

नाव - Vijay S. Paranjape

रा. Amravati